म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७८८.

# गीतेचें वैशिष्ट्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ८८२
ता. २५।७।३५
ठाणें.



"...चा विशेष आहे–इतर सर्व साधनांहून"
...ह असें आमचें स्पष्ट मत आहे.
—[ पृष्ट. १७ ]

REFBK-0005250

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७३८८
ठाणें

रा. सा...

|| महाराष्ट्र-साहित्य-सेवक ग्रंथमाला ||

पुष्प १२ वें.

( पुस्तक ५ वें. )

# गीतेचें वैशिष्ट्य.

REFBK-0005250

लेखक,

गंगाधर रामचंद्र साने, बी. ए., बी. टी.

५२५०.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

प्रथमावृत्ति ] किंमत ४ आणे. [ सन १९३५

पुण्यांत फोटोग्राफीचे कोणतेही काम मनपसंत करून
मिळण्याचे प्रसिद्ध ठिकाण म्हणजेच

# "साळवी" फोटो-आर्टिस्ट

— दिवसा व रात्रौ —

किर्लोस्कर थिएटर

नवीन फॅशनेबल फोटोग्राफी ग्रुप फोटो, कपल, लहान मुलांचे आईसह वगैरे निरनिराळे फक्त १-८-० रु. ४ फोटो

तसेच जुन्या व लहान फोटोवरून मोठे, सुंदर व रंगीत फोटो एन्लार्जमेंट्स करून मिळतील.

चौकशी करा.

---

उत्तम शिलाई व टिकाऊ तयार कपडे
शिलाईच्या भावांत

मिळण्याचें एकच ठिकाण—

**संघवी ब्रदर्स,** बुधवार चौक,
माडीवर, पुणें.

पत्ता पूर्ण लक्षांत ठेवा.



" Then the Lord, to cheer him, spake the wonderful Song, the song Celestial, that, uttered five thousand years ago, has since echoed from heart to heart, sweetest and loftiest of all teaching given to those who love the Lord. "

— ( Anne Besant ).

" The song celestial, the Bhagwatgita, is the one book in which every human being, from the lowest to the highest, has something to learn, something to guide, something to know and appreciate the true value of the surroundings amidst which he lives. The sphinx of human life has never been so successfully tried and solved as in this immortal work of the human mind. "

— ( Seekar ).



॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥

# प्रकाशकाचे चार शब्द.

सन १९२५ सालीं गीताजयंती निमित्त लिहिलेल्या प्रस्तुत निबंधाचें प्रकाशन आज करण्याचा सुयोग त्या मंगलमय प्रभूच्या कृपेनें येत आहे, याबद्दल कृतज्ञताभावानें त्याचें आम्ही आधीं स्मरण करतों.

शक्यतर अन्यप्रकाशकाकडून प्रस्तुत छोटेखानी पुस्तक छापावें अशी माझी इच्छा होती व भगवत्कृपेनें ती सर्वांशीं नसली तरी कांहीं अंशीं सफल झाली. ती अशी कीं, येथील "चैतन्य" मासिकाचे विद्वान् संपादक, राष्ट्रीय कीर्तनकार, ह. भ. प. कोल्हटकरबुवा यांना मी प्रस्तुत निबंध दाखविला तेव्हां त्यांना तो पसंत पडून आपल्या 'मासिका'तून तो क्रमशः—हप्त्याहप्त्यानें-प्रसिद्ध करण्याचें व अधिक प्रती वेगळ्या हव्या असल्यास काढून देण्याचें त्यांनीं मोठ्या मनःपूर्वक कबूल केलें, व त्याप्रमाणें तत्परतेनें घडवूनही आणलें; त्यामुळें सहाजीकच आमच्या खर्चाचा बोजाप्रस्तुत बाबतींत थोडाबहुत हलका झाला, याबद्दल आम्ही बुवांचे मनःपूर्वक आभार मानतों. "गुणी गुणं वेत्ति" हेंच खरें. तसेंच, प्रस्तुत पुस्तक छापून झाल्यावर त्यास आशीर्वादात्मक अभिप्राय देण्याची वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे, श्री. ज. स. उर्फ तात्यासाहेब करंदीकर, संपादक केसरी, कै० लोकमान्य टिळकांचे विद्वान् नातू, मराठ्याचे संपादक, व प्रसिद्ध गीताभ्यासक श्री. ग. वि. केतकर व प्रसिद्ध कवि 'मुकुंदराय' उर्फ मिरजकरशास्त्री, यांनीं जी तत्परता दाखविली, त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहें.

माझी किंवा माझ्या 'माले'चीहि स्थिति मोठीशी स्पृहणीय नाहीं हें आपणांस ठाऊकच आहे. अशाही स्थितींत, केवळ ध्येयावर दृष्टी देऊन, अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक चालविलेल्या माझ्या 'माले'च्या १२ व्या पुष्पाचें हें पांचवें पुस्तक मी आज प्रकाशित करीत आहें. तरी सर्व सहृदय सज्जनांनीं माझ्या ह्या कार्यास सहानुभूतिपूर्वक सक्रिय सहाय करावें, अशी जनताजनार्दनाचे चरणीं नम्र विनंति करून हे चार शब्द येथेंच पुरे करतों.

सर्वांचा नम्र,

ता. २४।१२।३५

गं. रा. साने.

# अभिप्राय

—१—

॥ श्री ॥

गीताधर्ममंडळाचे चालक, वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे, आपल्या अभिप्रायांत म्हणतात:—

श्री. गं. रा. साने यांनीं गीतेचें वैशिष्ट्य हा लेख चांगला अभ्यासपूर्वक लिहिला आहे असें ठिकठिकाणीं त्यानीं जे अनेक ग्रंथांतील उतारे उद्धृत केले आहेत त्यावरून कोणासहि दिसून येईल. विशेषतः ज्ञानेश्वरीवर त्यांचा भर अधिक आहे. अनेक इंग्रज ग्रंथकरांची जरी त्यांनी प्रमाणें दिलीं असलीं तथापि त्यांच्या अभ्यासातील बुद्धिस्वातंत्र्य लोपून जात नाहीं. इतर–ग्रंथकारांचें कितीहि साह्य घेतलें तरी खरा अभ्यास मूळ ग्रंथाचाच व्हावयास पाहिजे. श्री. साने यांनी ज्ञानेश्वरादिकांचें साह्य घेतलें असलें तरी मूळ भगवद्गीतेचा अभ्यास त्यांनीं चांगला केला आहे आणि म्हणूनच त्यांनी गीतेचें वैशिष्ट्य कर्मयोगपर असल्याचें स्पष्ट सांगितलें आहे. मूळ ग्रंथाचा स्वतंत्र बुद्धीनें कसून अभ्यास केल्यास ग्रंथकाराचा आशय कोणता व भाष्यकार किंवा टीकाकार यांचे साह्य कोठपर्यंत घ्यावयाचें याची मर्यादा निश्चित करतां येते......सांख्य–योग–इत्यादि मार्गांतील योग्य भाग ग्रहण करून व त्याची अवश्य तितकी कर्मयोगास जोड देऊन व्यक्तीस मोक्षदायक व समाजास अभ्युदयकारक असा हा कर्मयोग भगवंतानी उपदेशिला आहे. श्री. साने यांनी प्रस्तुत लेखांत सांख्य, भक्ती, योग, ज्ञान, इत्यादि मार्गांपेक्षां गीतेचें वैशिष्ट्य कर्मयोगात्मक असल्याचें फार सरस भाषेनें व स्वतंत्र बुद्धीनें सांगितलें आहे तें सर्वांनीं अवश्य वाचावें अशी शिफारस करून लेखक श्री. साने यांचें आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करितों.

सदाशिवशास्त्री भिडे,
चालक--गीता–धर्म–मंडळ.

— २ —

‘ केसरी’चे संपादक श्री. ज. स. उर्फ तात्यासाहेब करंदीकर, आपल्या अभिप्रायांत म्हणतात:—

‘ गीतेचें वैशिष्ट्य ’ या नांवाचा एक निबंध श्रीयुत ग. रा. साने, यांनीं लिहिला आहे. त्यांत थोडक्यांत गीतेतील रहस्य मार्मिकपणें उकलून दाखविलें आहे. कै० लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्य ग्रंथ प्रकाशित करून गीतेच्या रहस्याचें उद्‌घाटन केल्यावर त्या रहस्यांत गुप्तपणा असा राहिलाच नाहीं. तथापि अद्यापि असे अनेक संशयात्मे आहेत कीं ज्याना हें रहस्य सांगून देखील पटत नाहीं किंवा मनांत बिंबत नाहीं. अशा संशयग्रस्तांच्या मनांतील संशयाचें किल्मिष झाडून टाकण्याकरितां गीतेचें रहस्य जितक्या विविध लेखकांकडून जितक्या विविध स्वरूपांत पुनः पुनः सांगितलें जाईल तितकें हवेंच आहे. याच दृष्टीनें असल्या निबंधांची उपयुक्तता सतत कायमच राहणार.

प्रस्तुतच्या निबंधांत मुख्यत्वेंकरून लोकमान्यांचें गीतारहस्य आणि भारताचार्य नानासाहेब वैद्य यांचा महाभारताचा उपसंहार या दोन ग्रंथांचा आधार घेऊन आपल्या मताची मांडणी केली गेली आहे व ती सुव्यवस्थित झाली आहे. याशिवाय ज्ञानेश्वरींतीलहि निवडक आधार जागोजाग दिले असल्यानें त्या मांडणीला पक्केपणा आला आहे. गीतेच्या पूर्वींचे वेद व उपनिषदें हे जे अमोलिक ग्रंथ त्यांतील कर्मकांडाला व ज्ञानकांडाला बेपर्वाईनें लाथाडून न देतां त्यांचाच होता होईल तो उपयोग करून घेऊन त्यांत भक्तिमार्गाचें मोहन घालून हा कर्मयोगरूपी नवा मेवा भगवंतानी कसा तयार केला याचें विवरण या निबंधांत विशदपणें केलें आहे. गीतेंतले बीजभूत श्लोक कोणते आणि गीतेचा उपदेश कोणत्या केंद्राभोवती घिरट्या घालीत आहे हें ज्यास अचूक शोधून काढतां आलें त्यासच गीतेचें रहस्य उकललें असें म्हणतां येईल. असें बीजभूत श्लोक प्रत्येक अध्ययांत एकदोन तरी आहेत. त्यांतले बरेच श्लोक या निबंधांत आधारभूत म्हणून घेतलेले आहेत. ‘ यतः प्रवृत्तिर्भूतानां ’ हा १८ व्या अध्यायांतला श्लोक अशाच बीजभूत श्लोकांतला एक महत्वाचा श्लोक आहे. त्याचें मर्म ज्यानें जाणलें त्याला गीतेचें रहस्य उकललें असें म्हणता येईल. तसें तें या निबंधांत उकलून दाखविलें आहे.......लो० टिळक आणि चिंतामणराव वैद्य यांनीं गीतेचें रहस्य उकलतांना जेथवर टप्पा गांठला तेथपर्यंतचा रस्ता हे निबंधकार

आपल्या वाचकांना दाखवून देत आहेत व तोच रस्ता बिनधोक असून गीतेच्या खऱ्या रहस्याला पोचविणारा आहे अशी आपल्यां वाचकांची खात्री पटवीत आहेत. यावरून ही गोष्ट सिद्ध होत आहे कीं, गीतारहस्यानें आखून दिलेला रस्ता आतां बहुजनमान्य झाला आहे व अनेकांनी त्या मार्गाचा अवलंब केल्यानें तो रस्ता इतका रुळला गेला आहे कीं आतां या पुढें कोणीहि नवा वाटसरू हा लोकमान्य मार्ग सोडून सांप्रदायिक आडमार्गाला सहसा जाणार नाहीं. 'भाष्यकारातें वाट पुसत' जाण्याचें आता कारण राहिलें नसून यापुढें ज्या कोणाला गीतामंदिर गाठावयाचें असेल तो गीतारहस्याला वाट पुसत जाईल. अशी वाट विचारण्याची पाळी देखील मार्गस्थावर येऊं नये म्हणून ठिकठिकाणीं मार्गदर्शक खांब पुरणें जरूर असतें आणि प्रस्तुतचा निबंध हा असाच एक मार्गदर्शक खांब होण्याच्या लायकीचा आहे.

पुणें ता. २३।१२।३५ ज. स. करंदीकर,
संपादक—केसरी.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५२४०
ग्रंथ संग्रहालय

—३—

१९२५ सालीं गीताधर्ममंडळानें गीताजयंतीनिमित्त गीतारहस्याचे उपसंहारांतील गीतेचें वैशिष्ट्य वर्णन करणाऱ्या एका महत्त्वाच्या वाक्याचा विषय देऊन निबंध मागविले होते. त्यावेळीं रा. साने यांनीं लिहिलेला निबंध ते स्वतःच प्रसिद्ध करीत आहेत. गीतेचा हिंदुधर्मातील अनेक मार्गांचा समन्वय म्हणजे नुसतें मिश्रण नाहीं. तसा समन्वय कोणताहि चतुर पण स्वत्व नसलेला पुरुष करूं शकला असता. पण गीताकाराचें विशिष्ट स्वत्व असें होतें. स्वतःला प्रचारकाच्या अभिनिवेशानें सांगण्यासारखा विशिष्ट इहपर कल्याणकारक व्यष्टिसमष्टिहितसाधक धर्म्य मार्ग गीताकारांजवळ होता. या मार्गामध्यें इतर मार्गांतील तत्वांचा हंसक्षीर न्यायानें यथान्याय व यथाप्रमाण समावेश गीताकारांनीं बेमालूमपणें केला आहे. ही गीतेची अपूर्वता होय. नुसत्या समन्वयांत प्रेषिताच्या बाण्यानें ठासून सांगण्याची प्रेरणा बहुधा नसते तर उलट प्रेषिताच्या तळमळीनें उपदेश करणाऱ्याचे अंगीं एकांडेपणा असतो. गीतेंत दोहोंतील इष्ट भाग घेऊन अनिष्ट भाग टाळला आहे. या वैशिष्ट्याचें विवरण करावयाचें म्हणजे जवळजवळ सर्वच विषयांचा परामर्ष

घ्यावा लागतो. अर्थात् केवळ गीतेचेंच नव्हें तर इतर धार्मिक ग्रंथांच्या वाचनाचीहि अशा निबंधाला आवश्यकता आहे.

रा. साने यांनीं स्वतःच्या हौशीनें व आवडीनें असें धर्मग्रंथांचें वाचन केलें असल्याचें त्यांच्या निबंधामध्यें त्यांनीं जे जागोजाग दाखले दिले आहेत त्यावरून दिसून येतें. हा निबंध गीतेचा विषय समजून सांगण्याबरोबर गीतेचें महत्त्व सर्वांना इतकें कां वाटतें याचें कारणहि बरोबर दाखवील. म्हणून तो विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त आहे. सामान्य वाचकांनाहि रा. साने यांनीं अनेक आधारांनीं केलेलें हें विवेचन थोडक्यांत पुष्कळ माहिती देणारें म्हणून उपयुक्त वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

ता. २३।१२।३५ पुणें. ग. वि. केतकर.

— ४ —

श्री.

पुणें २४।१२।३५

श्री. गं. रा. साने यांसी

सा. न. वि. वि.

आपला गीतेचें वैशिष्ट्य हा निबंध मी लक्ष्यपूर्वक वाचिला. हातीं घेतलेला विषय अवतरणांकित भाषेनें व प्रमाणबद्ध पद्धतीनें रंगविण्याची आपली पद्धति फार चांगली आहे. निष्कामकर्मयोगाची महती या निबंधानें वाचकांस सहज रीतीनें कळून येईल. आरंभीं घेतलेलें आधारभूत वाक्य पूर्णपणें सिद्ध करून आपण गीतारहस्याचें जणूं काय हृदयाविष्करणच केलें आहे असें वाटतें. होतकरू अभ्यासकास हा निबंध " गीतेचा मार्गदर्शक " म्हणून उपयोगीं पडेल यांत शंका नाहीं. हायस्कूल—कॉलेजच्या विद्यार्थि मंडळींनीं हा निबंध अवश्य वाचावा म्हणजे त्यांस गीतेची गोडी लागेल. कळावें हे, वि.

मु. ग. मिरजकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७३८८

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. निबंध
ता.

# गीतेचें वैशिष्ट्य.

—०(✱)०—

**आधारभूत वाक्यः—**

" वैदिक धर्मांत मोक्षप्राप्तीची जीं जीं मुख्य साधनें किंवा मार्ग आहेत त्यापैकीं प्रत्येक मार्गांतून कांहींना कांहीं तरी भाग गीतेंत घेतला आहे, व इतकें करूनही " भूतभृन्नचभूतस्थो " ( गी. ९–५ ) या न्यायानें गीतेंतील खरें रहस्य पुनः ह्या सर्व मार्गांपेक्षां निराळेंच आहे "—

—( गीतारहस्य—पान ४६६ )

प्रथमारंभीं " मामनुस्मर युध्यच " म्हणणाऱ्या भगवंताला अनन्य-भावानें नमस्कार करून प्रस्तुत निबंधलेखनास प्रारंभ करतों.

वेद, वेदांत सांख्य, योग, व धर्म किंवा नीति, इतकीं मतें भगवद्गीतेपूर्वीं मोक्षप्राप्तीचीं साधनें म्हणून प्रचलित होतीं. त्या प्रत्येकांतील दोषाचा थोडक्यांत नामनिर्देश करून, त्याचा त्याग गीतेनें कसा केला व ग्राह्यांश कसा घेतला, व सर्वांच्या जणों समन्वयानें एक नवीच इमारत Golden mean सारखी कशी उभी केली, भगवंतांनीं कोणकोणत्या गोष्टीवर हल्ले चढवून स्वतःचें असें कोणतें विशेष मत व कोणता मार्ग त्यांत प्रतिपादिला, हें आतां आपणांस पहावयाचें आहे.

भगवद्गीता या ग्रंथाचे कर्ते— या गीतोत्तमाचे कर्ते गायक " यस्य निश्वसितं वेदाः " असे पुराणपुरुषोत्तम भगवान् श्रीकृष्ण होते— " हा वेदार्थ सागरु । जया निद्रिताचा घोरु । तो स्वयें श्रीसर्वेश्वरु । प्रत्यक्ष अनुवादला ॥ " असें ज्ञानेश्वरही आपणांस सांगतात. असो. त्या भगवंतांनीं आपल्या आसपास व सभोंवार पाहिलें तों वर सांगितलेल्या विविध मतांचा बुजबुजाट— " नाना मतांचा गलबला । " दृष्टीस पडला व " शास्त्रांचा बाजार भरला । " आहे असें त्यांस दिसून आलें ! प्रवृत्तिनिवृत्तिच्या आंदोलनांत धार्मिक बाबतींत प्रवृत्तिनिवृत्तिंच्या कळसाला लोक जाऊन पोंचले होते असें त्यांस आढळून आलें. " मोक्षाचें साधन सनत्सुजातीय आख्यानांत संसार सोडून अरण्यांत जाऊन निष्क्रिय बनून परमेश्वराचें

दा. क्र. ५२५०

चिंतन करणें हेंच ठरविलें आहे. वेदांत, सांख्य, व योग यांचा मोक्षमार्ग बहुधा हाच आहे. " ( ' महाभारत–उपसंहार ' पृ. ७५१ ) ' संसार कीं कांतार ? ' असा प्रश्न केला असतां दुसऱ्याचाच बाजूनें बहुतेकांचीं मतें पडत होतीं. त्यांतहि कचित्– " कस्यैषावाग्भवेत्सत्या नास्ति मोक्षो-गृहादिति । " ( शांतिपर्व अ. २६९–२० ) अशा तऱ्हेचे उद्गार निघत नसत असें नाहीं. पण " एकंदर या बाबतींत भिन्नभिन्न मतांचा विचार करतां महाभारतकाळीं गृहांत राहून मोक्ष मिळत नाहीं असें मत ग्राह्य करण्याकडे अधिक कल दिसतो. " ( " महा. उप. " पृ. ७५२ ). याचें प्रसिद्ध उदाहरण म्हणजे " सुलभा–जनक संवाद " होय. धर्मध्वज-जनक हा पंचशिखाचा ( सांख्य मताचार्यांपैकीं एकाचा ) शिष्य असून त्यानें संन्यास घेतला नव्हता व संन्यास न घेतां राज्य करीत असतांही त्याचें नैष्कर्म्य कायम होतें असें त्यानें " त्रिदंडादिषु यद्यस्ति मोक्षो ज्ञानेन कस्यचित् । छत्रादिषु कथं न स्यात् तुल्यहेतौ परिग्रहे ? ॥ " ( शां. अ. ३२०–४२ ) ह्यांत म्हटलें आहे. पण सुलभेनें या मताचें खंडन करून संसारत्यागाशिवाय मोक्ष नाहीं, संन्यास घेतल्याशिवाय खटाटोप अर्थात् मनाची व्यग्रता बंद होणें शक्य नाहीं, असें सांगितलें. ती स्वतः यतिधर्म पाळणारी होती. असो. तर " चार्वाकाशिवाय सर्व निरनिराळ्या मतांचे आचार्य जगतांत दुःख भरलें आहे असें एकवाक्यतेनें मानतात आणि यामुळेंच संसार सोडून देऊन कोणत्या तरी प्रकारानें अलिप्त होण्याचा उपदेश ते करतात. सांख्यमतवादी असोत किंवा योगी असोत, वेदांती असोत, किंवा नैय्यायिक असोत, बौद्ध असोत, किंवा जैन असोत, त्या सर्वांच्या मनावर हेंच एकसारखें आरूढ झालेलें आहे कीं या जगांतील सुखें केवळ दिखाऊ आहेत; आणि जगतांतील वैभव क्षणभंगुर आहे. बुद्धाला रोगी, म्हातारा, व मृत अशी तीन माणसें पाहूनच तीव्र वैराग्याचा झटका आला. त्याच्या मनांत भरलेल्या जगतांतील संपूर्ण वस्तूंच्या द्वेषाचा भडका होण्यास एवढीच ठिणगी पुरेशी झाली, व हें जग जन्म, मृत्यु, जरा, व्याधि, अशा दुःखांनीं भरलेलें आहे अशी तीव्र भावना होऊन तो संसार सोडून निघून गेला. मोक्षधर्माच्या शांतिपर्वांतील पहिल्या अध्यायांत ह्याच वैराग्यकारी विषयाचें प्रतिपादन आहे....... इंद्रियांचा संसर्ग विषयापासून तोडल्या-शिवाय मुक्ति नाहीं असें योगीहि म्हणतात. सांख्यांच्या मतानेंहि प्रकृति–

पुरुष–विवेक झाला पाहिजे, आणि हाच संसाराचा एका प्रकारानें त्याग आहे. संसारत्यागावर बौद्धाचा आणि जैनांचा तर पूर्ण कटाक्ष होता; आणि त्यांनीं याचसाठीं भिक्षुसंघाची स्थापना केली, आणि बौद्ध आणि जैन भिक्षु पुढें याचसाठीं प्रसिद्धीस आले." ("महा. उप." पा. ७५२–५३). तेव्हां—"कोणत्याहि कारणानें असो, पण भारतीय आर्य–तत्वज्ञान्यांचा कल संसार दुःखमय आहे असेंच मानण्याकडे आहे, यांत संशय नाहीं" (म. उ. पा. ७५४). भगवंतांचा या बाबतींतला अभिप्राय अर्थात् वरील सर्व मतांशीं, म्हणजे 'संसार दुःखमय आहे व त्यांतील सुखें क्षणभंगुर आहेत' ह्या सिद्धान्ताशीं जुळताच आहे. कारण तो सिद्धान्तच तितका सत्य आहे; तेव्हां सत्याचा परित्याग प्रत्यक्ष परमेश्वर झाला तरी तो कसा करणार? किंबहुना, तसा तो करील तर तो परमेश्वरच नव्हे. कारण "सत्य तेंचि परब्रह्म" असें मुक्तेश्वर आपणांस सांगत आहेत. असो. तर भगवंतांनींही "अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्" ह्या ओळींत "हा मृत्युलोक अनित्य व असुख आहे म्हणजे क्षणभंगुर व दुःखदायी आहे, यासाठीं तूं माझी भक्ति कर" असेंच सांगितलें आहे. ज्ञानेश्वरानींही "म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये श्रवणीं। काय सुखनिद्रा अंथरुणीं। इंगळाच्या?॥" इत्यादि ओव्यांतून हीच गोष्ट—हाच प्रभूंचा अभिप्राय अधिक खुलवून सांगितला आहे. अर्थात् वरील सिद्धान्ताचे बाबतींत भगवान् श्रीकृष्णासुद्धा सर्वांचें मतैक्य आहे हें येथवर सिद्ध झालें. पण त्यावर उपाय काय? या दुःखमय संसारांतून 'मुक्तिच्या वाटे' स लागण्यास कोणचा मार्ग आहे किंवा त्यासाठीं काय करावें? या बाबतींत किंवा या प्रश्नावर मात्र इतर बहुतेक तत्वज्ञान्यांची बिचारी तुकडी एका बाजूस, व भगवान् श्रीकृष्ण व त्यासारखे विचारी तत्ववेत्ते दुसऱ्या बाजूस, असा हा लढा आहे. आणि येथेंच भगवंतांचें विशेषत्व व मतप्रतिपादनांतील अतुल शौर्य आणि निधडी छाती दिसून येत आहे! पहिल्या तुकडीचा यावरील तोडगा किंवा उपाय म्हणजे "अर्थातच संसारांतील पुनर्जन्माच्या फेऱ्यांतून सुटून जाण्याचा सरळ व एकच उपाय म्हटला म्हणजे संसारत्याग होय असें त्यांचें मत होणें साहजिक आहे" (म. उ. पा. ७५४). पण भगवंतांचें या बाबतींतलें मत निराळें आहे,

व तें उलट बाजूच्या भ्याडपणावर मात करणारें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एकाचा उपदेश संसार सोडून द्या, षड्रिपूपासून व त्यांच्या विषयापासून दूर पळा, तर दुसऱ्याचा उपदेश "पद्मपत्रमिवांभसि" असें, "जैसें जळींचें जळीं न शिवे। कमलपत्र॥" असें रहा, व इंद्रियस्वरूप आडदांड घोड्याला कबजांत आणून, त्याशीं झगडून, त्यावर लीलेनें मांड टाका व 'कूर्मांगा' प्रमाणें "तैसीं इंद्रियें आपैसीं होती। जयाचें म्हणितलें करिती।" अशा स्थितप्रज्ञाची स्थिति अंगीं बाणवून घ्या! यांतून कोणचा उपदेश अधिक तडफीचा व वीरश्रीचा आहे हें एखादें मूलही सांगू शकेल. थॉमसनसाहेबहि आपल्या "भगवद्गीतेच्या प्रस्तावने"त हीच गोष्ट सांगतातः—

"The ज्ञानयोग or school of पंतजलि enjoins the avoidance of temptation. The कर्मयोग or school of भगवद्गीता enjoins the combating of temptation. Both teach that the world is evil and that its influence, which tends to obstruct devotion, must be destroyed. The one says, "Avoid the world," the other more courageously bids us to meet it with a wellarmed faith and a well-fortified heart; the difference between them is the same as that between the monk & the priest of modern days, & our author has justly appreciated the superiority of the latter." (Page CIX Introduction to Bhagwatgita by J. Cockburn Thomson). श्रीयुत चिंतामणराव वैद्यही ह्या भगवंतांच्या दणदणीत मताला उचलून धरतांना म्हणतातः—

"परंतु सर्वच तत्वज्ञानी अशा प्रकारचे भ्याड, संसारास भिऊन पळून जाणारे नव्हते. कांहीं असे धीट, जोरदार, बुद्धिवान् लोक उत्पन्न होणें आर्यांच्या इतिहासांत आश्चर्यकारक नाहीं, कीं ज्यांनीं सामान्य लोकमतप्रवाहाच्या विरुद्ध जाऊन संसारांत रहाणें व धर्मानें व नीतीनें आचरण करणें हेंहि मोक्षाचें कारण आहे असें प्रतिपादन करावें. अशा थोड्या तत्वज्ञान्यांपैकीं श्रीकृष्ण हा अग्रणी होता व त्यानें आपलें हें स्वतंत्र मत मुख्यतः भगवद्गीतेमध्यें प्रतिपादन केलें आहे. तें असें कीं मोक्षमार्ग, निष्क्रियत्व, किंवा संन्यास, हा जितका निश्चित किंवा भरंवशाचा

निबंध ५५२
नों.नं. ७३८



आहे तितकाच स्वधर्मानें, न्यायानें, निष्कामबुद्धीनें म्हणजे फलत्यागबुद्धीनें कर्म करणें हाहि मोक्षाचा निश्चित व भरंवशाचा मार्ग आहे. " ( म. उ. पा. ७५४ ). हा मार्ग फक्त गीतेनींच सांगितला नसून व्यास वाल्मीकिनीं हीच गोष्ट आपल्या जगन्मान्य राष्ट्रीय ग्रंथांतून—रामायणमहाभारतांतून—विविध उदात्त पात्रांच्या द्वारें सिद्ध केली आहे व " न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः " असें व्यास बाहे उभारून सर्व जगास सांगत आहेत. " भगवद्गीतेमध्येंहि या विषयाचा विचार अप्रतिम रितीनें केलेला असून सज्जनांचे सद्गुण कोणचे असतात, हें वर्णन केलेलें आहे. " (म. उ. पा. ७५६ ). ते सद्गुण अर्थात् " अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः " इत्यादि गीतेच्या १६ व्या अध्यायांत सांगितले असून त्यांस " दैवी संपत्ति " म्हटलें आहे व " दैवी संपद्विमोक्षाय " ( भवति ) असें सांगितलें आहे. म्हणजे हे दैवी गुण, हे सव्वीस दैवीगुण म्हणजे " मोक्षचक्रवर्तीचे अग्रहार " च होत ह्यांत कांहीं संशय नाहीं. " कीं गुणकुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसीत असे ॥ कीं सव्विसें गुणज्योति । इहीं उजळूनि आरती । गीता आत्मया निजपती । नीरांजना आली ॥ " ह्या बहारीच्या ओव्यांतूनही अशा दैवी गुणांनीं नटलेला मनुष्य " निर्विण्णसागराच्या गंगेंत " नाहून मोक्षतटावर जाऊन कसा बेधडक उभा राहतो—मुक्त होऊन जातो—ईंच ज्ञानोबांना विविधरूपकद्वारें सांगावयाचें आहे. असो.

याच ठिकाणीं ह्या नीतीच्या मार्गासंबंधीं आपण अजून थोडासा विचार करूं या. पूर्वींच्या यासंबंधींच्या ग्रंथांतून धर्माच्या पोटांतच नीतीचा समावेश होत असून ईश्वरावर अचलश्रद्धा किंवा निष्ठा याही गुणाचा अंतर्भाव त्यांतच होत होता अशी आमची समजूत आहे. कारण व्यासवाल्मीकींनीं जीं उदात्त चरित्रें अथवा चित्रें आपणापुढें रेखाटलीं आहेत त्यांतील प्रत्येक चित्रांतील व्यक्तीच्या ठायीं असणाऱ्या नीतीच्या कपाळीं धर्माचा अथवा ईश्वरीनिष्ठेचा सौभाग्यकुंकुमतिलक झळकताना आपणांस

आपलें विशेष मत सांगण्याचें कारण पडण्याचें कारण हेंच कीं, त्या त्या मतांचे लोक कोणी प्रवृत्तीच्या परमावधीला तर कोणी निवृत्तीच्या टोकाला धावून भलतीकडेच भरमळले होते, व त्या प्रत्येक मार्गांत सामान्य लोकांना अप्रिय अथवा अनुसरण्यास कठिण असा कांहींना कांहीं भाग असल्यामुळें सामान्य समाजाची निराश्रयक अवस्था झालेली होती. या सर्व गोष्टींचें विस्तृत विवेचन करण्यास येथें स्थलावकाश नाहीं. पण थोडक्यांत त्याचा इतिहास सांगायचा तर असा सांगता येईल:—जुन्या कर्मठ कर्मकांडावर व स्वर्गसुखासाठीं हपापलेल्या आणि म्हणूनच खऱ्या आत्मसुखास पारख्या झालेल्या याज्ञिकांच्या चुकलेल्या बुद्धीवर व वृत्तीवर प्रथम हल्ला उपनिषदांनीं—औपनिषदिक वेदांतानीं—चढविला, व संन्यास आणि तप या मार्गाचा उपदेश केला. पण "हळूहळू ही निवृत्तिवृत्तिही दुसरीकडे कळसास गेली" (म. उ. पा. ८७४) व "यदहरेव विरजेत तदहरेव प्रव्रजेत" यांतील पहिल्या अर्धाचा विसर पडून हजारो लोक केवळ ही संन्यासाची वावटळ उठली होती म्हणूनच केवळ संन्यासी झाले. पण त्याचा परिणाम "सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदं" ह्या प्रसिद्ध वचनाप्रमाणें "उठला सुटला क्षणभर टिकणाऱ्या वैराग्यानें संन्यास घेऊन अरण्याश्रय करूं लागेल तर शहरांतील गर्दी मोडून अरण्यांत गर्दी होईल. किंबहुना, समाजाचें नुकसान होऊन समाजांत अनीति माजेल!" (म. उ. पा. ८७४-७५) असा झाला. शिवाय "यज्ञयागादिकांच्या कडकडीत बंधनाला कंटाळलेल्या विद्वान लोकांनीं केलेली ज्ञानयोगाची मांडणी कालांतरानें विस्कळित होऊं लागली" (वे. नि. पा. ९) व "उपनिषदांतील उच्च विचार समजण्याइतकी बुद्धि नसणाऱ्या लोकांचें समाधान होईना" (वे. नि. पा. ३५) आणि "ब्राह्मणकाळच्या यज्ञस्तोमानें, कर्मठ लोकांच्या आढ्यतेनें, जेथें तेथें अडवणूक" सुरूच होती. तेव्हां वेदबीद सब झूट है म्हणणारें प्रसिद्ध चार्वाकमत कांहीं काळ पुढें येऊन गाजलें. पण मानसिक उन्नतीचा सर्वच चित्रपट उघळून देऊन प्रो. मॅक्सम्युलर साहेब म्हणतात त्याप्रमाणें "Utilitarianism & crude hedonism in the most out-spoken way" शिकविणाऱ्या (P. 133 "Six systems of Indian Philosophy") ह्या मताचा शेवटपर्यंत टिकाव लागणें शक्यच नव्हतें. तेव्हां "असल्या विचारानें

समाजाचें बंधन सुटणार हें पाहून तसल्याच विचाराचें निराळें रूप पुढें आलें. तेंच सांख्यमत होय." ( वे. नि. पा. ३७ ) "हें मत कांहीं वेळ पटलें असावें. परंतु शेवटीं ह्यांत ईश्वराची हेळसांडच असल्यामुळें लोकांचें अखेरीस समाधान होईना. पूजन करण्याची इच्छा मनुष्याला स्वाभाविक असते. विशेष विचाराशिवाय ह्याच्यापुढें गति जात नाहीं. ह्या कारणानें सेश्वर सांख्य किंवा योगमार्ग निघाला." ( वे. नि. पा. ४० ) पण ह्याही मताची विशेष चलती होऊं शकेना. कारण योगमार्ग बोलायला सोपा असला, तरी तो ज्ञानयोगाइतकाच कठिण आहे. त्यांत अंतरसृष्टींत मनाशीं आणि षड्रिपूंशीं झगडावें लागतें, तर बाह्यसृष्टींत देहादिकांला आसनप्राणायामादीनीं दंडावें लागतें. मिळून दोन्हीकडून त्रासच ! त्यांतच अष्टसिद्धींचा झपाटा ! त्यामुळें "अद्वैतमार्गाची जी शांति व समाधानवृत्ति ती एका बाजूस राहिली" व शिवाय कोणच्याही कारणानें का होईना, पण "कष्ट करून खात्रीनें यशप्राप्ति होते असा नेम लागेना" ( वे. नि. पा. ४० ) असो. अशा रीतीनें इतकीं मतें व साधनें निघूनही लोक पुन्हा असंतुष्ट राहिले ते राहिलेच. किंबहुना, एक ठाम मत नसल्यामुळें, सर्व बाजूनीं सुखाचा मार्ग दाखविणारी कोणतीच दिशा नसल्यामुळें, लोकांची स्थिति ह्यावेळीं निर्नायकासारखी झाली, व जो जें सांगेल त्याप्रमाणें करीत सुटावें अशी त्यांची स्थिति झाली. "शांतिपर्वामध्यें कोल्हा व गिधाड यांच्या उपदेशाची गोष्ट भीष्मानें सांगितली आहे. त्यावरून जनसमाजाच्या मनोवृत्तीचा अदमास केला तर क्षणोक्षणीं त्यांचीं मतें पालटत होतीं असें दिसतें. जसा सांगणारा भेटेल त्याच्यामागें धावायला मंडळी तयार होती, असें त्या रूपकाचें तात्पर्य आहे. मेलेलें प्रेत दहन करावें असें कोणी सांगितलें कीं तयारी लोकांची, पुरावें म्हटलें कीं त्यालाही रुकार, उघड्या जागीं फेकून द्या म्हटलें कीं त्यालाही कोणाची हरकत नाहीं. ही बंडाची पूर्वस्थिति होय. शास्ता, अधिकारी, सत्ताधीश नाहींसा झाल्यामुळें लोक सैरावैरा झाले." ( वे. नि. पा. ४१ ) अर्थात् अशा वेळीं छातीठोक पुढें होऊन भगवंतांनीं कसें अलौकिक कार्य केलें, व समाजाचा अधिकारी शास्ता होऊन, त्या त्या मतांतील दोषांचें आविष्करण करून ते काढून टाकून व ग्राह्यांश घेऊन, सर्वांच्या समन्वयानें ताजमहालासारखी दिव्य प्रासादतुल्य अशी भगवद्गीतेची भव्य इमारत कशी उठवून दिली व स्वतः-

च्या विशेष मतांचा कळस त्यावर कसा झगझगीत रीतीनें चढविला, हेंच आपणांस आतां पहावयाचें आहे. पण वाचकांनीं वरील इतिहास नीट लक्षांत घ्यावा. म्हणजे त्या पार्श्वभूमीवर भगवंतांच्या दिव्य कामगिरीचें चित्र कसें अधिकच उठावदारपणें झळकत आहे, हें त्यांच्या ध्यानीं येईल. असो.

पैकीं, पहिलें मत वेदांचें. यज्ञयागादि कर्में करून स्वर्गप्राप्तीचें अक्षय्य ( ? ) सुख प्राप्त करून घ्यावें अशी त्या वेळच्या याज्ञिकांची भ्रांत समजूत होती. अर्थात् या समजुतीवर प्रथम हल्ला उपनिषदांनीं चढविला हें आपण वर पाहिलेंच आहे. उपनिषदामागून गीतेनींही तेंच काम केलें. कारण " सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः । पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ " ह्या प्रसिद्ध श्लोकांत म्हटल्याप्रमाणें सर्व उपनिषद्रूप धेनूंचें काढलेलें मधुर दुग्ध म्हणजे भगवद्गीता होय; अर्थात् तिनेंहि तोच मार्ग अनुसरावा हें साहजिक आहे. कारण वैदिकांचा या बाबतींतला बुद्धिभ्रंशच तितका चीड आणणारा होता. साहजिकच भगवान् गीतेच्या दुसऱ्या व नवव्या अध्यायांत " यामिमां पुष्पितां वाचं, " " कामात्मानः स्वर्गपरा " " भोगैश्वर्यप्रसक्तानां, " " त्रैगुण्य विषया वेदाः, " व " त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा, " आणि " ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं " या श्लोकांतून मुख्यतः याज्ञिकांच्या मूढपणावर हल्ला चढवीत असून त्यांची फटफजिती उडवीत आहेत; आणि या कामीं ज्ञानेश्वरांनीहि " वेश्याभोगा कवडा वेचे । मग दारही चेपूं नये तियेचें । तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । दिसत असे ॥ " इत्यादि मर्मभेदक आणि झणझणींत ओंव्यांनीं प्रभूंचा अभिप्राय चांगलाच व्यक्त करून दाखविला आहे. असो. तथापि, न्या. तेलंग आपल्या " भगवद्गीतेच्या प्रस्तावनें "त जे म्हणतात कीं—" Krishna does not on the whole throw the Vedas entirely overboard. He feels & expresses reverence for them. " त खरें आहे. कारण अग्नींत हवन करूं नये, दानधर्म करूं नये, असें भगवंतांचें म्हणणें नाहीं. उलट—" यज्ञोदानंतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् । यज्ञोदानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ " असेंच त्यांचें मत असल्याचें ते आपणांस गीतेच्या १८ व्या अध्यायांत सांगत आहेत. पण—" एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च । कर्तव्या-

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थल प्रत सं. निबंध

नीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥" अशी त्यांनीं एक मेख मारून ठेवली आहे. याच मेखेमुळें, याच 'असंगा' च्या व 'फलत्यागा' च्या तत्वांमुळें पूर्वीच्या गारगोटीचा हिरा, किंवा कोळशाचें माणिक बनवलें गेलें आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण "कृपणाः फलहेतवः" असें त्यांचें ठासून सांगणें आहे. अर्थात् दाढा पाडलेला सर्प जसा निर्विष व म्हणूनच त्रास देण्यास अक्षम बनतो, इतकेंच नव्हे, तर उलट गारुड्याच्या पुंगीवर वाटेल तसें नाचून डोलून लोकांचें मनोरंजनच करतो, त्याच प्रमाणें ह्या पवित्रभूत यज्ञयागांची मग स्थिति होणार आहे. कारण अग्नि हें देवाचें–परमेश्वराचें–पवित्र मुख आहे, व त्यांत शुद्धांतःकरणानें परमेश्वरास स्मरून "ओंतत्सत्" ह्या मंत्राचा मनोभावानें उच्चार करून आहुति टाकल्यास तिच्यासारखी पवित्र व मोक्षदायी तीच आहे, हें वेदांना व त्यांतील यज्ञयागांना अविचारानें अजिबात उडवून देणारांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. असो. भगवान् श्रीकृष्ण १७ व्या अध्यायांत ह्या मोक्षमार्गी मुमुक्षूंच्या यज्ञविधानादिकांचें "ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः" ह्या व "तस्मादोमित्युदाहृत्य" ह्या, अशा २३ व २४ व्या श्लोकांतून बहारीनें वर्णन करीत असून, अशा प्रकारें ओंकार प्रणवाच्या उच्चारानें प्रारंभ झालेल्या त्या ब्रह्मवाद्यांच्या क्रिया त्यांना कशा शेवटीं मोक्षप्रद होतात तें ज्ञानेश्वरानींही "ॐ तत्सत् ऐसें। हें बोलणें तेथ नेतसे। जेथूनि कां हें प्रकाशे। दृश्यजात ॥" ह्या ओवींत उत्कृष्टपणें सांगितलें आहे. बोला, वाचक! याहून तुम्हांस तरी काय अधिक पाहिजे? मग अशा मंत्राच्या जोरावर चालणाऱ्या यज्ञयागादि क्रियांना तुम्ही वाईट म्हणणार काय? शक्यच नाहीं! आणि म्हणूनच भगवंतांनीं त्यांतील व्यभिचारी वासनेचें बीज काढून टाकून, त्या शुद्ध विनिर्मल यज्ञयागादिकांची स्तुति करून, आत्मशुद्ध्यर्थ त्यांचा उपयोग आहे म्हणून त्यांस–अशा शुद्ध यज्ञयागादि क्रियांस–आपल्या मतांत मिळवून घेतलें आहे. अर्थात् अतिरेकाला जाऊन भलतीकडेच भरंगळलेल्या मतांना परत खेंचून आणून मध्यबिंदूवर स्थिर करायचें हें जें भगवंतांचें उद्दिष्ट तें त्यांनीं यांत उत्तम प्रकारें साधलें आहे यांत शंका नाहीं. जातां जातां तिसऱ्या अध्यायांतील "सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः" ह्या आणि "देवान्भावयतानेन" ह्या दोन श्लोकांसंबंधीं इतकेंच सांगायचें कीं, पूर्वीच्या यज्ञपद्धतीला पुष्टिदायक असे

५२५० नोंद नं. ७३०८

हे श्लोक कै० डॉ. गुणे सारख्यांना वाटले होते. तथापि कर्मयोगार्थ अवतरलेल्या तिसऱ्या अध्यायांत आलेल्या ह्या 'यज्ञ' शब्दाचा अर्थ 'स्वधर्म' असा आहे, हें ज्ञानेश्वरांची त्यावरील टीका वाचणारांस तेव्हांच कळून येईल. आणि हाच अर्थ योग्य आहे, हें कोणीहि प्रांजल मनुष्य कबूल करील. असो.

यज्ञयागांच्या काम्यक्रिया त्यावेळीं प्राबल्यांत असून प्रवृत्तीच्या परमावधीला गेल्या होत्या व म्हणूनच भगवंतांना या कामीं त्यांना मागें खेंचून आणून मध्य बिंदूवर स्थिर करावें लागलें, एवढेंच नव्हे, तर एकंदर कर्मयोगाच्याच उपदेशास प्रभू गीतेंत अथपासून इतिपर्यंत प्रवृत्त झालेले असल्यामुळें यज्ञच काय, पण दान, तप, इत्यादि कोणच्याहि विहित क्रिया "संगं त्यक्त्वा फलानिच" कराव्याच कराव्या "हा चांग। निरोपु माझा ॥" हेंच त्यांचें अखेरपर्यंत सांगणें व मत आहे, किंबहुना, अत्यंत जाज्वल्य कर्मोपदेश हा गीतेचा एक बिनमोल विशेष आणि श्रीकृष्णांची एक अलौकिक कामगिरी आहे! कारण, वैदिक जसे त्यावेळीं प्रवृत्तीच्या प्रबळ टोंकास धांवले होते व म्हणूनच भलतीकडेच भरंगळले होते, तसेंच, त्यांच्या मागून येणारे वेदांतीहि निवृत्तीच्या अतिरेकास जाऊन तप, संन्यास, ( सर्व कर्म ) त्याग, इत्यादिकांच्या गोष्टी बोलूं लागले होते. कांहीं अंशीं सांख्यांचीं व योग्यांचींहि अशीच मतें होतीं. तेव्हां तप म्हणजे काय, संन्यास कशास म्हणतात, सर्वकर्मत्याग शक्य आहे काय, नसल्यास मग त्याग कशाचा करावा—म्हणजेच त्यागाची खरी व्याख्या काय, इत्यादि गोष्टींचा विचार करणें भगवंतांस भागच होतें. तो त्यांनीं कसा केला तें आतां आपण पाहूं.

प्रथम हें सांगणें अवश्य आहे कीं, या कामीं संन्यास, सांख्य, तप, इत्यादिकांची योग्यता भगवान् जाणून होते व त्यानेंहि मोक्ष मिळेल एथपर्यंत सुद्धां कबुली देणें त्यांना भागच होतें; आणि ती त्यांनीं तशी आनंदानें दिलेलीहि पण आहे. कारण तीं तीं मतेंहि तितकींच जोरदार होतीं, व त्यांचें निवृत्तीपर तत्वज्ञानांतील सत्यही नाकारतां येणें शक्यच नव्हतें. तेव्हां—"संन्यासः कर्मयोगश्च निश्रेयसकरावुभौ।" किंवा 'यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते।" अशी तर कबुली त्यांना

सुरवातीला यावीच लागली. किंबहुना,—" यं संन्यासमिति प्राहुर्योगंतं विद्धि पांडव ।" किंवा, " सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः । एकं सांख्यं च योगं च यःपश्यति स पश्यति ॥ " इतका अभेद मानण्यापर्यंत, अर्थात् तात्त्विकदृष्ट्या ते एकच आहेत हें सांगण्यापर्यंत प्रभूंची मजल गेलेली आहे, व ती योग्यच आहे. कारण सर्वांचें अंतिम ध्येय एकच—म्हणजे मोक्षच—आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं; व ह्या अर्थानें त्या सर्व मार्गांत अभेदच आहे. अर्थात् त्यांचें ऐक्य जें गीतेला दाखवावयाचें आहे तें व्यावहारिक नसून पारमार्थिक अथवा ध्येयाच्या दृष्टीनें दाखवावयाचें आहे हें उघड आहे. असो. पण इतकी कबुली दिल्यानंतर मात्र भगवान् बाजूस सरले आहेत, किंबहुना, त्या सर्व मार्गांपेक्षां आपला कर्मयोगच अधिक चांगला आहे—" तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ॥" असेंच त्यांचें सांगणें असून तें त्यांनीं सर्व गीतेभर सिद्ध करून दिलें आहे. इतकेंच नव्हे तर, खुद्द संन्यास, त्याग, तप इत्यादिकांच्या कल्पना व व्याख्याहि त्यांच्या कांहीं निराळ्याच आहेत; व सर्वकर्मसंन्यास होणें अशक्य आहे व तें नुसतें थोतांड आहे, असें म्हणण्यापर्यंत त्यांची घडाडी जाऊन पोंचली आहे! 'वाङ्मय,' 'शारीर' व 'मानस' तपाच्या त्यांनीं दिलेल्या सतराव्या अध्यायांतील व्याख्या पाहिल्या म्हणजे पूर्वींच्या तपःकल्पनेहून त्या किती भिन्न आहेत हें वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येणार आहे. तसेंच संन्यास व त्याग याबद्दलहि " काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ ", ( भ.गी. अ. १८–२ ) ह्या त्यांच्या व्याख्या पाहिल्या, म्हणजे ह्या बाबतींत भगवंतांची कल्पना पूर्वींच्या समजुतीहून कशी भिन्न होती हें तेव्हांच समजून येईल. अर्थात् संन्यास म्हणजे सर्वकर्मसंन्यास नव्हे, तर काम्य कर्मांचा संन्यास होय, व त्याग म्हणजे सर्व कर्मांचा त्याग नव्हे तर सर्व कर्मांच्या—अर्थात् राहिलेल्या नित्य नैमित्तिक कर्मांच्या—फलांचा त्याग म्हणजेच त्याग होय, हेंच भगवंतांना येथें सांगावयाचें आहे; व ज्ञानेश्वरानींहि "हा संन्यासु जै संभवे । तै काम्य बाधूं न पवे । निषिद्ध तव स्वभावें । निषेधें गेलें ॥ आणि नित्यादिक जें असे । तें येणें फलत्यागें नासे । शिर लोटलीया जैसें । येर आंग ॥ मग सस्य फळ पाकांत । तैसें निमालिया कर्मजात । आत्मज्ञान गिंवसित । आपैसें ये ॥ "—ह्या ओंव्यांतून तेंच भगवंतांचें

म्हणणें आपल्या सुंदर दृष्टांतांनीं खुलवून दाखविलें आहे. एवढेंच नव्हे, तर या प्रकारचा संन्यास आणि त्याग करणाराच्या घरीं आत्मज्ञान त्याला शोधीत येतें, म्हणजे तो खरा ब्रह्मज्ञानी महात्मा होऊन मुक्त होऊन जातो, असें सांगून प्रभूंचा भाव ज्ञानोबांनीं चांगला विशद करून दाखविला आहे यांत शंका नाहीं. असो.

याप्रमाणें वैदिकांच्या यज्ञदानादिकांतले दोष दाखवून, त्या विधीला शुद्ध करून घेऊन, त्याच प्रमाणें वेदांत्यांच्या तप, संन्यास, त्याग इत्यादि मोक्षाच्या साधनांला निष्क्रियावस्थेंतून वरील अठराव्या अध्यायांतच नव्हे, तर त्या आधीं मागेंच सहाव्या अध्यायाचें प्रारंभींच्या " अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः। स संन्यासी च योगी च न निरग्निर्नचाक्रियः॥" ह्या श्लोकांतही सोडवून त्यांना कार्यप्रवण केल्यावर भगवंतांनीं सांख्यशास्त्रातले व योगमार्गातले दोष कसें दाखविले व तीं साधनें सर्वांना सफल न होण्याची कारणें काय सांगितलीं तें पाहून मग आपण प्रभूंनीं कोणचा मार्ग मुख्य सांगितला व त्यासाठीं वेदवेदांतादि साधनांच्या मतांतून कोणकोणचा ग्राह्यांश घेतला तें पाहूं, म्हणजे झालें.

सांख्यशास्त्रांतला एकच एक पण तो दुहेरी दोष असा होता कीं, सांख्य हे अद्वैती तर नव्हतेच पण ते निरीश्वरवादीहि होते, आणि ह्यामुळेंच ह्या मताची चलती फार दिवस होऊं शकली नाहीं, हें आपण मागें पाहिलेंच आहे. आणि ह्यांतील द्वैतीमताची गोष्ट गंभीर शब्दांत कां होईना पण दोष म्हणूनच भगवंतांनीं ज्ञानेश्वरमुखानें तेराव्या अध्यायाच्या १८ व्या श्लोकावरील भाष्यांत अर्जुनाच्या ' प्रज्ञेचें अदळपणा ' ला पुढें करून " तुझिया मनोधर्मा मिळेलना ॥" म्हणून फारच बहारीच्या ओव्यांनीं सांगितलेली आहे. पण द्वैतज्ञान ही तत्वज्ञानांत कांहीं मोठीशी उच्चावस्था नव्हे. " अर्जुना जिये ठायीं । न सरे द्वैताची वही।" अशा त्या सर्वत्र संचलेल्या व आद्यंतीं एकच एक असलेल्या ब्रह्माच्या विभागाची व्यवस्था ' प्रज्ञेचे अदळपण ' ज्यांचे ठायीं आहे असे तत्ववेत्तेच करीत असतात. आणि म्हणूनच खुद्द कपिलाचें द्वैती असें सांख्यतत्वज्ञानशास्त्र हें खालच्या पायरीचें होय, हें भगवंतांच्याच शब्दांत सिद्ध झालें. असो. कपिलाच्या सांख्यशास्त्राचा दुसरा मोठा दोष म्हणजे सांख्य निरीश्वरवादी होते हा होय. " ईश्वरासिद्धेः।" किंवा " प्रमाणाभावान्नतत्सिद्धिः।" असल्या

प्रकारानें कपिल ईश्वर मानीत नाहीं. " प्रत्यक्ष आणि अनुमान एवढी दोनच प्रमाणें सत्यज्ञानप्राप्तीचीं साधनें होत अशी त्याची समजूत होती व ह्याच्या जोरावरच तो ईश्वराचें अस्तित्व नाकारीत होता " असें ॲडेलंगसाहेबांनींहि आपल्या " Historical Sketch of Sanskrit Literature From German by Adelung " ह्या ग्रंथांत पान १५४ वर म्हटलें आहे. पण ही कपिलाची चूक आहे. आणि म्हणूनच सर्व मतांचा समन्वय करण्यास बसलेल्या प्रभूंनीं ही उणीव काढून टाकली व क्षराक्षराहून पलीकडे असूनही " यो लोकत्रयमाविश्याबिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ " असा ' उत्तम पुरुष ' अथवा ' पुरुषोत्तम ' मानलेला आहे; कारण वेदांती व वेदांताला अनुसरणारी गीता—प्रत्यक्ष उपनिषद्रूप धेनूंचें दुग्धच अशी गीता—हीं अद्वैती व सेश्वरवादी आहेत. त्यांची उडी आणि भरारी सांख्यांच्या फार पुढें आहे. सांख्यांना ती समजली नाहीं——तितकी आकलनशक्ति त्यांचे ठायीं नव्हती—म्हणून ते मागें पडले. सांख्यांच्या प्रकृतिपुरुषाला दोहींलाहि भगवंतांनीं आपल्या प्रकृतिमध्येंच घातलें असून त्यांना ' अपरा व परा ' ( गौणी व श्रेष्ठा ) म्हटलें आहे ( पहा—भ. गी. अ. ७, श्लो. ४,५ ). पण " ह्या दोन्हींहि माझ्याच प्रकृति असल्यामुळें " अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ मत्तःपरतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय । मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ये चैव सात्विका भावा राजसातामसाश्च ये । मत्त एवेति तान्विद्धि " हें शेवटीं तूं ओळख" असें भगवंतांचें अर्जुनाला सांगणें असून ह्या मतास मिळवून घेण्याचा गोड आणि बहारीचा समारोप आहे. असो.

यानंतर योगशास्त्राचा उल्लेख एकंदर मुख्यत्वेंकरून ६ व्या व १२ व्या अध्यायांत आलेला आहे. ६ व्या अध्यायांत " समं कायशिरोग्रीवं " वगैरे चित्तैकाग्र्यास साधनीभूत असे आसनादिकांचे नियम सांगितले असून " युक्ताहारविहारस्य " ह्या प्रसिद्ध श्लोकांत टापटिपीनें सर्व व्यवहार करणाराला तात्पुरतें म्हणजे जरूरीपुरतें तरी योगसाधन कसें अशक्य नाहीं तें दाखविलें आहे. पण अकराव्या अध्यायांतील ' विश्वरूपदर्शना ' नंतर बाराव्या अध्यायाचे प्रारंभास अगदीं शेवटपर्यंत—परब्रह्मपदापर्यंत—जाऊन भिडणाऱ्या योगशास्त्राच्या साधनासच हात घालून जेव्हां त्यांची व भक्तिमार्गाची तुलनाच अर्जुनानें आरंभिली व त्यावर त्यांनीं

आहे; स्थलावकाश नसल्यामुळें ती येथें सर्व देतां येत नाहीं त्याला उपाय नाहीं. तथापि मासल्यासाठीं कांहीं ओंव्या देतों. ज्ञानोबा म्हणतात:––"कीं प्राप्तकर्म सांडिजे। येतुलेनि नैष्कर्म्य होइजे। हें अर्जुना वाया बोलिजे। मूर्खपणें ॥ देखें विहितकर्म जेतुलें। तें सगळें जरी वोसंडिलें। तरी स्वभाव काय निमालें। इंद्रियांचें?॥ हें न ठकेचि कांहीं। तरी सांडिलें तें काई?।.... म्हणउनि संगु जव प्रकृतीचा। तंव त्यागु न घडे कर्माचा। ऐसियाही करूं म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे!॥" (अध्याय ३). १८ व्या अध्यायांतील उपरिनिर्दिष्ट श्लोकांवर भाष्य करतांना ते म्हणतात:––"आणि हांगा सव्यसाची। मूर्ति लाहोनि देहाची। खंती करिती कर्माची। ते गांवढे गा!॥ मृत्तिकेचा वीटु। घेऊनि काय करील घटु?। केउते तंतु पटु। सांडील तो?॥ तैसा शरीराचेनि आभासें। नांदतु जव असे। तंव कर्म–त्यागाचें पिसें। काइसें तरी?॥ जे श्वासोश्वासवरी। होय निजेलियाही वरी। कांहीं न करणेंचि परी। होती जयाची!॥". अर्थात् कर्मत्याग अशक्य असून कर्मफलाचा त्यागच श्रेष्ठ होय व याप्रमाणें म्हणजे कर्मफलत्यागरूपानें कर्मत्याग जो करील तो खरा त्यागी होय असें सांगतांना ज्ञानोबा म्हणतात:––"म्हणोनि यापरी जगीं। कर्मे त्यजी तो महात्यागी। येर मूर्च्छने नांव रोगी। विसांवा जैसा!॥" असो. इतर सर्व मार्गाला बाजूला सारून भगवंतांचें हें मत कसें दणदणीत रीतीनें पुढें येत आहे हें "सहयज्ञाः प्रजाःसृष्ट्वा" ह्या तिसऱ्या अध्यायांतील श्लोकावरील ज्ञानोबांची टीका वाचली असतां तेव्हांच समजून येईल. तसेंच ह्या मार्गाची मोक्षप्रदताहि भगवंतांनीं जागोजाग सांगितली आहे. उदाहरणार्थ "स्वे स्वे कर्मण्यभिरतः" व "यतः प्रवृत्तिर्भूतानां" हे १८ व्या अध्यायांतील दोन श्लोक व त्यांवरील ज्ञानोबांची टीका या कामीं प्रसिद्धच आहेत. असो.

आतां इतर वैदिक साधनांतून ह्या कर्मयोगमार्गाच्या पुष्ट्यर्थ कोणकोणता ग्राह्यांश घेतला तें पाहूं. पैकीं वैदिकांच्या यज्ञयागादि क्रिया, 'पावनानि मनीषिणाम्' आहेत म्हणून त्या अवश्य कराव्यात. फक्त 'असंग' व 'फलत्याग' हें त्यांत पाळून त्या कराव्या, हें प्रभूंचे सांगणें आपण मागें पाहिलेंच आहे. नंतर वेदांत्यांच्या तपाला यज्ञाप्रमाणेंच योजावें असें सांगून, तपाची आपली खरी व्याख्या देऊन, त्यांचें मुख्य तत्व जें 'सर्वं खल्विदंब्रह्म' आणि 'आत्म्याचें अमरत्व' त्याचा उपयोग दुसऱ्या

स्थळ प्रत
सं.
ता.

अध्यायांतच प्रभूंनीं करून घेऊन अर्जुनाला, कर्मयोगाच्या आचरणांत प्रसंगीं कराव्या लागणाऱ्या खणाखणीला चांगलें तयार केलें. त्यातले "नैनं छिंदंति शस्त्राणि" इत्यादि श्लोक प्रसिद्ध आहेत. नंतर सांख्यशास्त्रांतील प्रकृतिपुरुषविवेकही ह्या कर्मयोगाला सहाय्यकच असल्यामुळें त्या मतांतील त्रिगुणगुणमयी मायेच्या कर्तृत्वाचे खेळ, प्रकृतीचा सपाटा, आणि आत्मरूप पुरुषाची वास्तविक ह्या सर्व खेळापासून अलिप्तता, या तत्वांचा चांगला उपयोग करून घेतला असून "यस्यनाहंकृतोभावो बुद्धिर्यस्य न लिप्यते," "न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः," "यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।" इत्यादि कितीतरी श्लोकांतून त्यांचें प्रतिबिंब पडलेलें आहे. तसेंच "पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे" ह्या व ह्यापुढील श्लोकांत भगवंतांनीं सांख्यांच्या मताचा उपयोग केला असून त्याचाहि उपयोग कार्यकर्त्याला निगर्वी करण्यास चांगलाच होणार आहे. असो. नंतर ह्या कर्मयोगाच्या आचरणांत येणाऱ्या भल्याबुऱ्या प्रसंगांत चित्ताची शांति ढळून जाऊं नये, तर तें शांत आणि निर्विकार रहावें म्हणून "अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाण योगाचें।" अशा योगांतील स्थिरचित्तकारी व अकष्टप्रद अशीं कांहीं सूत्रेंहि गीतेच्या ६ व्या अध्यायांत "समंकायशिरोग्रीवं" वगैरे सांगितलीं आहेत. व "सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ" अशा तऱ्हेची वृत्ति बाणवून घे व ती वृत्ति ह्या योगावस्थेंत बाणते, म्हणून "तपस्विभ्योऽधिको योगी" ह्या श्लोकांत "तस्माद्योगी भवार्जुन" असें भगवान् म्हणत आहेत तें तरी, त्यामुळें कर्मयोगाचें आचरण अधिक शुद्ध आणि विनिर्मल व्हावें—"नैवंपापमवाप्स्यसि" असें व्हावें—यासाठींच म्हणत आहेत. असो. यानंतर धर्म किंवा नीति या मार्गांतील ईश्वरनिष्ठा याची चर्चा मागें झालेलीच आहे. येथें इतकेंच सांगायचें कीं, अशा तऱ्हेची जाज्वल्य निष्ठा कर्मयोगाच्या आचरणाला सहाय्यभूतच होणार आहे किंबहुना, तिच्यावांचून प्रसंगीं कर्मयोग लटपटून जाईल, इतकेंच नव्हे, तर कदाचित् अनीतिकर्दमांत रुतून बसेल, असें वाटून भगवंतांनीं ह्याहि मताचा आपल्या कार्यास कसा उपयोग करून घेतला तें भगवद्गीतेचा १२ वा अध्याय बोलतच आहे. "याहीवरीपार्था" वगैरे विवेचन आम्ही मागें केलेंच आहे. यानंतर परमेश्वराची भक्ति जर अंगींप्रत्यंगीं मुरलेली असेल तर फलाशा आणि अहंकार बाजूस

ठेवून केवळ प्रभूची आज्ञा आणि प्रभूस प्रिय गोष्ट म्हणून आपले भक्त कर्मयोगाचें आचरण अगदीं हां हां म्हणतां, धडाडीनें आणि सहज लीलेनें करतील हें जाणून, व मोक्षाचें कर्मयोगाइतकेंच, किंबहुना, त्याहून सुलभ-तर, फार काय, पण सर्वांत सुलभ असें साधन जो भक्तिमार्ग तो भगवंतांनीं गीतेच्या ९ व्या अध्यायांत विशेषतः स्त्री, वैश्य, शूद्र, चांडाळ यासारख्या अज्ञानी, असहाय, आणि दीन लोकांच्यासाठीं—ह्या हजारों गरीब जीवांचा कळवळा येऊन सांगितला हा गीतेचा दुसरा एक विशेष आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण यापूर्वीं कोणीहि त्यांना हा मार्ग खुला करून दिलेला नव्हता. खुद्द वेदाची संकुचितता आणि गीतेची उदार-मनस्कता या कामीं कशी आहे, तें ज्ञानेश्वरानीं " वेदु संपन्नु होय ठायीं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं ।" इत्यादि ओव्यांतून फारच बहारीनें दाखवून दिलें आहे. असो. भगवंतांच्या ह्या अद्वितीय, अमूल्य, आणि अलौकिक कामगिरीबद्दल श्री. चिं. वि. वैद्यांनींहि आपल्या " महाभारताच्या उप-संहारांत " असेच मननीय उद्गार पृ. ८७७–७९ मध्यें काढलेले आहेत तें अत्यंत वाचनीय आहेत. विस्तारभयास्तव ते येथें देतां येत नाहींत. पण वाचकांनीं ते मुळांतून अवश्य वाचून पहावेत असें सांगितल्यावांचून मात्र आमच्यानें राहवत नाहीं. असो. या प्रमाणें सर्व साधनांचा उपयोग करून शेवटीं—" कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ " असा धन्यवाद प्रभूकडून सर्वांनीं मिळवावा व जाज्वल्य कर्मयोगाचें आचरण करावें म्हणजे समाजसंस्थाहि ईश्वराच्या इच्छेप्रमाणें उत्कृष्ट चालून तुम्ही सर्व अंतीं उद्धरून जाल, असें सांगून वाचकांची रजा घेतों.

" सर्वेऽत्र सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यंतु माकश्चित् दुःखभाक् भवेत् ॥ "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ५२५०
REFBK-0005250

श्री. गं. रा. साने, बी. ए., बी. टी. यांचीं

मुलांमुलींसाठीं मुद्दाम लिहिलेलीं

# वाचनीय पुस्तकें !

| | | |
|---|---|---|
| (१) | भारतीय संग्राम ! (सचित्र) | किं. १८४ |
| (२) | मुलांचा मार्गदर्शक ! | ८१० |
| (३) | बालवीर अथवा धाडसी यशवंत ! | ८४ |
| (४) | अल्प रामायण ! (सचित्र) | ८४ |
| (५) | ललितवाङ्मय ! | ८४ |
| (६) | शिवशाही ते पेशवाई ! (सचित्र) (भाग १ ला–शिवाजी) | ८४ |
| (७) | शिवशाही ते पेशवाई ! (सचित्र) (भाग २ रा–संभाजी, राजाराम, शाहू) | ८४ |
| (८) | शिवशाही ते पेशवाई ! (सचित्र) (भाग ३ रा–बाजीराव व बाळाजी बाजीराव) | ८४ |
| (९) | शिवशाही ते पेशवाई ! (सचित्र) (भाग ४ था–माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव व रावबाजी) | ८४ |
| (१०) | गीतेचें वैशिष्ट्य ! | ८४ |
| (११) | बायकांचीं नवीं गाणीं ! (सचित्र) (भाग १ ला) | ८८ |
| (१२) | बायकांचीं नवीं गाणीं ! (सचित्र) (भाग २ रा) | ८८ |

पत्ता—गं. रा. साने, बी. ए., बी. टी., पेंडशांची चाळ, खो. नं. १७, आनंद छापखान्याजवळ, सदाशिव, पुणें २.

ठेवून केवळ प्रभूची आज्ञा आणि प्रभूस प्रिय गोष्ट म्हणून आपले भक्त कर्मयोगाचें आचरण अगदीं हां हां म्हणतां, धडाडीनें आणि सहज लीलेनें करतील हें जाणून, व मोक्षाचें कर्मयोगाइतकेंच, किंबहुना, त्याहून सुलभ-तर, फार काय, पण सर्वांत सुलभ असें साधन जो भक्तिमार्ग तो भगवंतांनीं गीतेच्या ९ व्या अध्यायांत विशेषतः स्त्री, वैश्य, शूद्र, चांडाळ यासारख्या अज्ञानी, असहाय, आणि दीन लोकांच्यासाठीं—ह्या हजारों गरीब जीवांचा कळवळा येऊन सांगितला हा गीतेचा दुसरा एक विशेष आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण यापूर्वीं कोणीहि त्यांना हा मार्ग खुला करून दिलेला नव्हता. खुद्द वेदाची संकुचितता आणि गीतेची उदार-मनस्कता या कामीं कशी आहे, तें ज्ञानेश्वरानीं "वेदु संपन्नु होय ठायीं। परी कृपणु ऐसा आनु नाहीं।" इत्यादि ओंव्यांतून फारच बहारीनें दाखवून दिलें आहे. असो. भगवंतांच्या ह्या अद्वितीय, अमूल्य, आणि अलौकिक कामगिरीबद्दल श्री. चिं. वि. वैद्यांनींहि आपल्या "महाभारताच्या उप-संहारांत" असेंच मननीय उद्गार पृ. ८७७–७९ मध्यें काढलेले आहेत तें अत्यंत वाचनीय आहेत. विस्तारभयास्तव ते येथें देतां येत नाहींत. पण वाचकांनीं ते मुळांतून अवश्य वाचून पहावेत असें सांगितल्यावांचून मात्र आमच्यानें राहवत नाहीं. असो. या प्रमाणें सर्व साधनांचा उपयोग करून शेवटीं—"कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः। स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥" असा धन्यवाद प्रभूकडून सर्वांनीं मिळवावा व जाज्वल्य कर्मयोगाचें आचरण करावें म्हणजे समाजसंस्थाहि ईश्वराच्या इच्छेप्रमाणें उत्कृष्ट चालून तुम्ही सर्व अंतीं उद्धरून जाल, असें सांगून वाचकांची रजा घेतों.

"सर्वेऽत्र सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यंतु माकश्चित् दुःखभाक् भवेत् ॥"

वाचन मंदिर ठाणे
क्र. ५२५०
REFBK-0005250

# ॥ महाराष्ट्र-साहित्यसेवक ग्रंथमाला ॥

**नियमः**—(१) एक रुपया प्रवेश फी भरून कोणासही-मालेचे कायम वर्गणीदार होतां येतें. (२) कायम वर्गणीदारांस सर्व पुस्तकें ३/४ किं. स मिळतात. ( ट. ख. नि. ).

**मालेचीं शिल्लक पुस्तकें !**

| | |
|---|---|
| ( १ ) कमला ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) | ८१० |
| ( २ ) भारतीय संग्राम ! ( सचित्र २ री आवृत्ति ) | १८४ |
| ( ३ ) सायुज्यसोपान ! ( चटकदार पारमार्थिक ग्रंथ ) | २ |
| ( ४ ) मुरारि ! ( शिवकालीन ऐति. कादंबरी ) | २ |
| ( ५ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! पूर्वार्ध-( सचित्र ) | २ |
| ( ६ ) प्रपितामहाच्या पदावर ! ( शिवकालीन ऐति. कादंबरी ) | २८८ |
| ( ७ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! उत्तरार्ध-( सचित्र ) | २ |
| ( ८ ) (१) अल्प रामायण ! ( सचित्र ) | ८४ |
| (२) ललितवाङ्मय ! | ८४ |
| (३) पावित्र्यप्रभाव ! | ८४ |
| (४) शिवशाही ते पेशवाई ! ( सचित्र काव्यमय इतिहास ) भाग १ ते ४ प्रत्येकीं | ८४ |
| (५) गीतेचें वैशिष्ट्य ! | ८४ |

याशिवाय—'मुलांचा मार्गदर्शक,' ८१० ' बालवीर अथवा धाडसी यशवंत' ८४; व 'बायकांचीं नवीं गाणीं' (सचित्र)भाग १ व २ प्रत्येकीं ८८; हा पुस्तकेंही आमचेकडे मिळतील. नं. २, ३, ५, ७, यांस व ' मुलांचा मार्गदर्शक ' यास बक्षिसें मिळालीं आहेत व सर्वच पुस्तकां-वर विद्वानांचे व वृत्तपत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. तरी आजच मागवा व उच्च वाङ्मयाचें सेवन करा !

**पत्ता—गं. रा. साने**, बी. ए., बी. टी., पेंडशांची चाळ, खो. नं. १७, आनंद छापखान्याजवळ, सदाशीव, पुणें नं. २